20रु. कोर्ट फी COURT Rs.20 9 APR 2018 भारत INDIA बीस रुपये TWENTY RUPEES

36/2018

## पहा नियम ६ (१)

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ याचा कलम १९ (१) अन्वये अपील**

**सहपत्र ''ब''**

प्रति,
प्रथम अपिलीय अधिकारी
बांधकाम विभाग (सांबांत साहेब)
मिरा-भाईंदर महानगरपालिका

| | | |
|---|---|---|
| १) अपिलकाराचे नाव | : | श्री मुस्तफा वनारा |
| २) पूर्ण पत्ता | : | फ्लॅट नं. १०१/ए, ओम साई एन्क्लेव, पूनम सागर कॉम्प्लेक्स, मिरा रोड पुर्व, ठाणे |
| मोबाईल नं. | : | ८०९७८७८७८२ |
| ३) राज्य शासकीय माहिती अधिकाऱ्यांचा तपशील | : | सार्वजनिक बांधकाम विभाग, मिरा-भाईंदर महानगरपालिका |
| ४) ज्या आदेशाविरुध्द अपिल केले असेल तो आदेश प्राप्त झालेली तारीख | : | |
| ५) अपिल दाखल करण्याची शेवटची तारीख | : | |
| ६) अपिलाची कारण | : | जे माहिती मागीतली होती ती मुद्दत संपल्यनंतरही ती माहिती मिळलेली नाही हया बाबत.... |
| ७) माहितीची तपशील | : | |
| (एक) आवश्यक असलेल्या माहितीचे स्वरूप व विषय | : | आरक्षण क्र. २३५, रामभाऊ म्हाळगी उद्यान बाबत... सदर आरक्षण विकतसी करताना केलेली निविदा प्रक्रिया कामाचे कायदेश कामाचे मोजमाप घेतलेली नोंदवही, काम प्रमाणात केल्यो प्रमाणपत्र अदा करण्यात आलेले देय टिपणी तसेच याबाबत सर्व कागदपत्रे सत्यप्रत मिळणे बाबत. |
| (दोन) माहिती ज्याच्यांशी संबंधित आहे त्या कार्यालयाचे किंवा विभागाचे नाव | : | सार्वजनिक बांधकाम विभाग, मिरा-भाईंदर महानगरपालिका |

ठिकाण: मिरा रोड
दिनांक : ०९/०४/२०१८

C-5105
मि. भा. म. न. पा.
सा. बां. विभाग
आ.क्र. ३६० अपिल
दिनांक ९।४।१८

श्री मुस्तफा वनारा

13/370

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

मुख्य कार्यालय : स्व. इंदिरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.), ता. जि. ठाणे ४०१ १०१
दुरध्वनी : २८१९२८२८ / २८१९३०२८ / २८१८११८३ / २८१८१३५३ / २५१४५९८५ फॅक्स : २८१९७६३६

## // बांधकाम विभाग //

RIGHT TO INFORMATION

जा.क्र. मनपा/साबां/मा.अ./३७० /२०१८-१९

दि. ०७/०५/२०१८

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग, मिरा-भाईंदर महानगरपालिका यांच्या समोरील माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (६) अन्वये दाखल झालेले अपिल.**

**प्रति,**

**१) अपिलकर्ता** :- **श्री. मुस्ताफा वनारा**
फ्लॅट नं. १०१/ए, ओम साई एन्क्लेव्ह,
पूनम सागर कॉम्पलेक्स, मिरारोड (पूर्व)
ता.जि. ठाणे ४०११०७.

Received

**२) जन माहिती अधिकारी** :- **नितिन मुकणे, उपअभियंता, बांधकाम विभाग**
**मुळ अर्जाची तारीख** :- **०८/०३/२०१८**
**प्रथम अपिलाची तारीख** :- **०९/०४/२०१८**
**सुनावणी दिनांक** :- **२६/०४/२०१८ दु. ४.१० वाजता**

## // पुर्वपिठिका //

श्री. मुस्ताफा वनारा यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये सादर केलेल्या अर्जाच्या माहिती बाबत अपिल दाखल केलेले आहे. अपिलकर्त्यांने माहितीचा अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार माहिती अधिकारी, सार्वजनिक बांधकाम विभाग, मिरा-भाईंदर महानगरपालिका यांच्याकडे दि.२८/११/२०१७ रोजी मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील भाईंदर (पूर्व) आरक्षण क्र.२३५ उद्यान अधुनिक पध्दतीने विकसित करणे कामाची निविदा, कामाचे कार्यादेश, कामाची मोजमाप पुस्तिका, अदा करण्यात आलेले देयक इ. कागदपत्रे माहिती मागितलेली आहे. माहिती अधिकारी यांनी इकडील मनपा/साबां/मा.अ./२५१/२०१७-१८ दि.२७/०३/२०१८ रोजीच्या पत्रान्वये माहिती तयार केलेली आहे. माहिती अधिकारी यांनी पत्र क्र.मनपा/साबां/१३६७१/२०१७-१८ दि.२७/०३/२०१८ अन्वये छायांकीत शुल्काचा भरणा करण्यास कळविले आहे. मात्र अर्जदाराने माहिती छायांकीत शुल्काचा भरणा केला नाही व माहिती प्राप्त करुन घेतली नाही. तद्नंतर श्री. मुस्ताफा वनारा यांनी माहिती प्राप्त न झाल्याचे कारण दर्शवून दि.०९/०४/२०१८ रोजी अपिल दाखल केलेले आहे.

## // न्यायनिर्णय //

अर्जदाराने माहितीच्या अधिकाराच्या अंतर्गत मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील भाईंदर (पूर्व) आरक्षण क्र.२३५ उद्यान अधुनिक पध्दतीने विकसित करणे कामाची निविदा, कामाचे कार्यादेश, कामाची

मोजमाप पुस्तिका, अदा करण्यात आलेले देयक इ. कागदपत्रे माहिती मागितलेली आहे. माहिती अधि यांनी मनपा/साबां/मा.अ./२५१/२०१७-१८ दि.२७/०३/२०१८ रोजीच्या पत्रान्वये माहिती तयार केलेली आ माहिती अधिकारी यांनी पत्र क्र.मनपा/साबां/१३६७१/२०१७-१८ दि.२७/०३/२०१८ अन्वये छायांकीत शुल्का भरणा करण्यास कळविले आहे. मात्र अर्जदाराने माहिती छायांकीत शुल्काचा भरणा केला नाही व माहित प्राप्त करुन घेतली नाही. तद्नंतर श्री. मुस्ताफा वनारा यांनी माहिती प्राप्त न झाल्याचे कारण दर्शवून दि.०९/०४/२०१८ रोजी अपिल दाखल केलेले आहे. सदरील अपिलाची सुनावणी दि.२६/०४/२०१८ रोजी ठेवण्यात आली. इकडील संदर्भिय पत्र क्र. मनपा/साबां/मा.अ./३७०/२०१७-१८ दि.२०/०४/२०१८ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थी यांस सुनावणीस उपस्थित रहाणेस कळविण्यात आले. सदरील सुनावणीस अपिलार्थी व माहिती अधिकारी उपस्थित होते. सुनावणी दरम्यान झालेल्या चर्चेनुसार व नस्तीचे तसेच दिलेल्या माहितीचे अवलोकन करून सदरील अपिलावर खालीलप्रमाणे निर्णय देण्यात येत आहे.

## // निर्णय //

अपिलकर्त्यास माहिती अधिकारी यांनी इकडील मनपा/साबां/मा.अ./२५१/२०१७-१८ दि.२७/०३/२०१८ रोजीच्या पत्रान्वये तयार केलेली माहिती ही अपिलकर्त्याने माहिती छायांकीत शुल्काचा भरणा केल्यानंतर देण्यात यावी.

सदर अपिल अर्ज निकाली काढण्यांत येत आहे.

**स्थळ** :- कार्यकारी अभियंता कार्यालय
मिरा-भाईंदर महानगरपालिका

**(दिपक खांबित )**
**अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता**
**मिरा-भाईंदर महानगरपालिका**

प्रत :-

१. **श्री. मुस्ताफा वनारा** फ्लॅट नं. १०१/ए, ओम साई एन्क्लेव्ह, पूनम सागर कॉम्पलेक्स, मिरारोड (पूर्व) ता.जि. ठाणे ४०११०७.

२. **नितिन मुकणे, जन माहिती अधिकारी तथा उप-अभियंता**, बांधकाम विभाग, मिरा भाईंदर महानगरपालिका

PC-10/NM/17-18/A-1/Adhesh-370

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

मुख्य कार्यालय : स्व. इंदिरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.), ता. जि. ठाणे ४०१ १०१
दुरध्वनी : २८१९२८२८ / २८१९३०२८ / २८१८११८३ / २८१८१३५३ / २५१४५९८५ फॅक्स : २८१९७६३६


## // बांधकाम विभाग //

जा.क्र. मनपा/साबां/ ११८८ /२०१७-१८
दि. ०७/०५/२०१८

Received.

प्रति,
**श्री. मुस्ताफा वनारा**
फ्लॅट नं. १०१/ए, ओम साई एन्क्लेव्ह,
पूनम सागर कॉम्पलेक्स, मिरारोड (पूर्व)
ता.जि. ठाणे ४०११०७.

**विषय :-** माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत अपिलाबाबत.

**संदर्भ :** १) इकडील मनपा/साबां/मा.अ/३७०/२०१८-१९ दि.०७/०५ /२०१८ चे आदेश.
२) अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता यांच्याकडे दि.०९/०४/२०१८ आपण दाखल केलेला अर्ज.
३) इकडील मनपा/साबां/माअ/२५१/२०१७-१८ दि.२७/०३/२०१८ चे पत्र.
४) इकडील मनपा/साबा/१३६७१/२०१७-१८ दि.२७/०३/२०१८ चे पत्र.

**महोदय,**

वरील संदर्भिय विषयानुसार आपण मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील भाईंदर (पूर्व) आरक्षण क्र.२३५ उद्यान अधुनिक पध्दतीने विकसित करणे कामाची निविदा, कामाचे कार्यादेश, कामाची मोजमाप पुस्तिका, अदा करण्यात आलेले देयक इ. कागदपत्रे माहिती मागितलेली आहे. सदरच्या माहिती बाबत आपण संदर्भिय पत्र क्र.२ नुसार मा. कार्यकारी अभियंता तथा अपिलीय अधिकारी, सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्याकडे अपिल दाखल केलेले आहे. सदर अपिलाची दि.२६/०४/२०१८ रोजी सुनावणी घेण्यात आली असून सदर सुनावणीत अपिलीय अधिकारी यांनी अपिलकर्त्यास संदर्भिय क्र. ०१ अन्वये इकडील मनपा/साबां/मा.अ./२५१/२०१७-१८ दि.२७/०३ अन्वये तयार केलेली माहिती अपिलार्थी यांनी माहिती छायांकीत शुल्काचा भरणा केल्यानंतर उपलब्ध करून देण्याचे आदेशीत करण्यात आलेले आहे. तरी सदरील माहिती सोबत (पृष्ठ क्र.१ ते २७३) उपलब्ध करून देण्यात येत आहे.

**माहिती अधिकारी (सा.बां)**
मिरा भाईंदर महानगरपालिका

**प्रत :-**
**मा. अपिलीय अधिकारी,**
सार्वजनिक बांधकाम विभाग
मिरा-भाईंदर महानगरपालिका

PC-9/NM/17-18/A-2/Letter-370